
# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-19 July-Aug-2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*July-Aug-2022 Volume-2 Issue-19*

*On*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Editor**
**Dr. Umakant Chanshetti**
Principal
Jawahar Arts, Science & Commerce College (Maharashtra) India

**Co- Editor**
**Dr. Maruti Musande**
**Dr. Rajshekhar Varshetti**
**Dr. Sunil Rajput**
**Dr. Ningappa Somgonde**

**Published by-** P. R. Talekar, Secretary, Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.19 July – Aug 2022

# भारतातील आदिवासी जमातींचा वर्गीकृत अभ्यास

**डॉ. शरद बाबुराव सोनवणे**
सहयोगी प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,साक्री
*Corresponding Author*- डॉ. शरद बाबुराव सोनवणे
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**प्रस्तावना**

भारतात आदिवासींची संख्या मोठी असून भारतातील विविध राज्यात विखुरलेल्या आदिवासींमध्ये कमी-अधिक प्रमाणात काही समान वैशिष्ट्ये दिसून येतात. परंतु असे असले तरी देशाच्या ज्या भागात हे लोक राहतात, तेथील पर्यावरणाचा व भौगोलिक वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर होत असतो. याबरोबरच भाषा, वंश, संस्कृती व आर्थिक स्थिती या सर्व बाबतीत भारतातील आदिवासी एकाच पातळीवर नाहीत. तसेच भारत हा विविधतेने नटलेला देश असून येथे भाषिक, धार्मिक, वांशिक आदी आधारावर विविधता दिसून येते. परिणामी भारतात राहणाऱ्या आदिवासींमध्ये देखील वैशिष्ट्यपूर्ण असे वेगळेपण आढळते. प्रस्तुत शोधनिबंधात या दृष्टिकोनातून भारतातील आदिवासींचा वर्गीकरणात्मक अभ्यास केला आहे.

**आदिवासींच्या सर्वसाधारण सांस्कृतिक विकासाच्या अवस्थेवर आधारित प्रकार**

भारतातील आदिवासी देशाच्या विविध भागात वेगवेगळ्या प्रमाणात आढळतात. त्याचबरोबर अर्थव्यवस्था, भाषा, वंश, सांस्कृतिक विकासाची पातळी अशा अनेक दृष्टींनी भारतीय आदिवासी जमातींमध्ये विविधता दिसून येते. या वेगवेगळ्या निकषाच्या आधारे आदिवासींचे वर्गीकरण केले जाते. 1952 मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या ट्रायबल वेल्फेअर कमिटीच्या अधिवेशनात आदिवासींच्या सर्वसाधारण सांस्कृतिक विकासाची अवस्था लक्षात घेऊन त्यांचे पुढीलप्रमाणे 4 प्रकार पाडले होते.

वन्य समूह- अरण्यात किंवा दऱ्याखोऱ्यात राहणारे व समाजजीवनाच्या प्राथमिक अवस्थेत असलेले आदिवासी या प्रकारात मोडतात.

अर्धवन्य समूह- इतर ग्रामीण समुदायांच्या आसपास राहणारे व शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या आदिवासींचा या प्रकारात अंतर्भाव होतो.

संस्कारित वन्य समूह- मूळचे वन्य पण स्थलांतर करून उद्योगधंदे, कारखाने, मळे इत्यादींमध्ये मजुरी करणारे आदिवासी या प्रकारात येतात.

विलीन जमाती- मूळचे आदिवासी पण सध्या इतर समाजाच्या चालीरीती आत्मसात केलेल्या लोकांचा या प्रकारात समावेश होतो.[9]

आदिवासींच्या आर्थिक क्रियांचा विचार करून अशाच प्रकारचे वर्गीकरण अनेक मानववंश शास्त्रज्ञ करतात. त्यानुसार आदिवासींचे पुढील प्रकार दिसतात.

1. शिकारीवर उपजिवीका करणारे आदिवासी.
2. कंदमुळे व फळे गोळा करून व काही प्रमाणात शेती करून जगणारी आदिवासी.
3. प्रामुख्याने शेती करणारे आदिवासी.
4. मजुरीवर पोट भरणारे आदिवासी.[10]

वरील दोन्ही वर्गीकरणामुळे आदिवासींमध्ये होत असलेल्या परिवर्तनाचे स्वरूप समजते. परंतु या वर्गीकरणामधून आदिवासींमध्ये असणारे अनेक मूलभूत भेद समजत नाहीत. म्हणून आदिवासींमधील भेद समजून घेण्यासाठी आदिवासींचे प्रादेशिक, भाषिक, वांशिक व सांस्कृतिक आधारावरील वर्गीकरणाचा उपयोग होतो.

**भौगोलिक किंवा प्रादेशिक निकषावर आधारित वर्गीकरण**

भारताच्या कोणत्या प्रदेशात आदिवासी एकवटलेले असून त्यांच्यात स्थूलमानाने कितपत साम्य आहे, याचा विचार करून भौगोलिक विभाग पाडले गेले आहेत. गुजरात राज्याच्या पूर्वेकडे विंध्य व सातपुडा या पर्वतांच्या रांगांशी समांतर असलेली अरण्ये व दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला प्रदेश हे भारतातील आदिवासींचे मुख्य वस्तीस्थान आहे. याखेरीज ईशान्येकडे आसाम व आसपासच्या प्रदेशात



Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.S.'s Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

दक्षिणेकडे आंध्र, तामिळनाडू व केरळ या राज्यातही आदिवासी मोठ्या संख्येने आहे. भौगोलिक किंवा प्रादेशीकदृष्ट्या या सर्व आदिवासींची विभागणी तीन, चार किंवा पाच विभागात करता येते.

*बी.एस.गुहा* यांच्या मते भारतातील आदिवासींचे तीन प्रादेशिक विभाग पडतात. 1. उत्तर व ईशान्येकडील आदिवासी, 2. मध्य भारतातील आदिवासी आणि 3. दक्षिणेकडील आदिवासी. *मदन आणि मजुमदार* यांनीही असेच विभाग सांगितलेले आहेत. *डॉ.दुबे* यांच्या विभागणीनुसार आदिम जमातीचे 1. उत्तर आणि ईशान्य विभाग, 2. मध्य विभाग, 3. दक्षिण विभाग आणि 4. पश्चिम विभाग असे चार भौगोलिक विभाग पडतात. गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानच्या काही भागातील आदिवासींचा स्वतंत्र असा पश्चिम विभाग डॉ.दुबे यांनी मानला आहे. *अटल* यांनी ही जवळजवळ अशीच विभागणी केली आहे. तर ऐतिहासिक, वांशिक आणि सामाजिक - सांस्कृतिक संबंध ध्यानात घेऊन *रॉय बर्मन* यांनी आदिवासींचे पाच प्रादेशिक विभाग केले आहेत. 1. ईशान्य भारत: आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, मिझोराम व त्रिपुरा येथील आदिवासी. 2. हिमालयाच्या पायथ्याशी असलेला उत्तर व वायव्य प्रदेशातील प्रदेश: उत्तर प्रदेशाच्या उत्तरेकडील व हिमाचल प्रदेशातील आदिवासी. 3. मध्य आणि पूर्व भारत: पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशातील आदिवासी. 4. दक्षिण भारत: तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकातील आदिवासी. 5. पश्चिम भारत: राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रातील आदिवासी.[11]

वरील सर्व विभागनींचा विचार करून तसेच भौगोलिक पर्यावरण सामाजिक व आर्थिक स्थिती वांशिक वैशिष्ट्ये इत्यादी निकष समोर ठेवून *डॉ.विद्यार्थी* आणि *डॉ.रॉय* यांनी पुढील प्रमाणे पाच विभाग पाडले आहेत.

हिमालयीन प्रदेश-

हिमालयाच्या दक्षिणेकडचा अतिशय विस्तीर्ण प्रदेश हा अनेक आदिवासी जमातींचे निवासस्थान असून विभागाचे तीन उपविभाग पाडता येतात. अ) ईशान्य हिमालयन विभाग: यामध्ये आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल'मधील दार्जिलिंगचा पहाडी भाग, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा यांचा समावेश होतो. ब) मध्य हिमालयीन विभाग: या विभागात उत्तर प्रदेशचा उत्तरेकडील भाग आणि बिहार हे प्रदेश येतात. क) वायव्य हिमालयीन विभाग: हिमाचल प्रदेश व जम्मू-काश्मीर'चा समावेश या उपविभागात होतो. या विभागातील आदिवासी जमातींमध्ये मिझो, गारो, खासी, अनेक नागा जमाती आणि इतरांचा समावेश होतो.

मध्य भारतीय प्रदेश-

बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा आणि मध्य प्रदेशातील आदिवासींचा हा प्रदेश आहे. या विभागात बैगा, गोंड, हो, उरॉव, संथाल, पहाडिया, कोल, मुंडा, बिरहोर, खोंड, बोंदो या प्रमुख जमाती आहेत.

पश्चिम भारतीय प्रदेश-

राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यातील आदिवासी जमातींचा या विभागात समावेश होतो. या प्रदेशात भिल्ल, गरासिया, दुबळा, गोंड, कोरकू, कोळी, कातकरी, वारली, पारधी, ठाकूर, कोल, कोलाम, मुंडा, परधान या प्रमुख जमाती वास्तव्य करतात.

दक्षिण भारतीय प्रदेश-

आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटक या राज्यांनी बनलेल्या ज्या विभागात आदिवासी जमातींच्या संख्येचे प्रमाण बरेच कमी आहे. या प्रदेशात चेंचू, कोया, येनाडी, गदबा, तोडा, कदर, अरियन, इरुल, मुथूवन, पलयन, मत्रण, कुरुंब, होलेथ यासारख्या अनेक लहान-लहान जमाती राहतात.

अंदमान, निकोबार आणि लक्षदिप बेटे-

अंदमान निकोबार ही बंगालच्या उपसागरातील बेटे आणि अरबी समुद्रातील लक्षद्वीप याठिकाणी अंदमानी, ओंगे, जरावा यासारख्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने प्राथमिक अवस्थेतील काही जमाती आहेत.[12]

**भाषिक आधारावर वर्गीकरण**

भारतीय लोकांची विविधता अनेक गोष्टींप्रमाणेच भाषांमधूनही दिसून येते. भारतातील आदिवासी वेगवेगळ्या भाषा बोलणारे आहेत. भारतीय भाषांच्या सखोल अभ्यासावरून भारतात



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

एकूण चार प्रमुख भाषाकुटुंबे असल्याचे दिसते. काही आदिवासी जमाती प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे ते आपल्या मूळ बोलीभाषा विसरले असले तरी बहुसंख्य आदिवासींनी आपल्या बोलीभाषा अद्यापही टिकून ठेवल्या आहे.[13]

सर ग्रिअर्सन यांनी 1890 मध्ये केलेल्या भारतातील भाषिक पाहणीनुसार त्यांना भारतात एकूण 179 भाषा आणि 544 बोलीभाषा असल्याचे दिसले. विशेष म्हणजे 179 भाषांपैकी 116 आदिवासी भाषा होत्या. भारतामध्ये प्रचलित असणाऱ्या व बोलल्या जाणाऱ्या भाषांची चार भाषा कुटुंबे पुढील प्रमाणे आहेत.

ऑस्ट्रिक भाषा कुटुंब-

जगाच्या विविध भागात ऑस्ट्रिक भाषा कुटुंबातील भाषा बोलल्या जातात. सर्व पॅसिफिक महासागरी भागातील लोक, ब्रह्मदेश, व्हिएतनाम, मलाया, इंडोनेशिया, उत्तर भारत, न्यूझीलंड, मादागास्कर या भागात राहणारे लोक ऑस्ट्रिक भाषा बोलतात. भारताच्या संदर्भात फक्त मध्य भारत व ईशान्य भागातील डोंगरी आणि पहाडी भागातील लोक ऑस्ट्रिक भाषा बोलतात.

मुंडा व कोल भाषा बोलणारे लोक प्रामुख्याने बंगाल, बिहार, आसाम, ओरिसा व मध्यप्रदेश या विभागात आढळून येतात. पण या भागातील आदिवासींना दुसरी एखादी भाषा शिकावीच लागते. कारण बंगाली, हिंदी, ओरिसा व मराठी भाषांचा प्रादुर्भाव या भागात झालेला आहे. त्यामुळे ऑस्ट्रिक भाषांचे शुद्ध स्वरूप कमी कमी होत आहे. आसाममधील दुर्गम भागात राहणाऱ्या खासी लोकांची खासी भाषा वगळता या भाषा कुटुंबातील भाषांचे भवितव्य धोक्यात असल्याचे दिसते.

तिबेटी चिनी भाषा कुटुंब-

तिबेट व चिनी भाषांची प्रतिनिधित्व करणारा हा भाषा कुठे आहे. यामध्ये विशेष करून तीन भाषांचा अंतर्भाव होतो. 1. तिबेटी-ब्रम्ही 2. थाई व चीनी 3. येनेसी. यापैकी येनेसी हा भाषा प्रकार भारतात बोलल्या जात नाही. थाई व चिनी भाषांचा वापर भारतामध्ये अगदी थोड्या भागात म्हणजे केवळ ईशान्य भागात केला जातो. यामध्ये सुद्धा अनेक भाषा अंतर्भूत होतात. पण केवळ खामती हीच भाषा अगदी विरळ भागात बोलली जाते. या भाषेचा उगम आग्नेय चीन मध्ये झालेला दिसून येतो. आणि ब्रह्मपुत्रेच्या मार्गाने ही भाषा भारतात आली व इरावती मार्गे ब्रह्मदेश व सयाम या भागातही या भाषेचा प्रसार झाला. ब्रह्मपुत्रेच्या मार्गाने ही भाषा भारतात आली म्हणून या भाषेला तिबेटी-ब्रम्ही असे म्हणतात. तिबेटी ब्राह्मणी भाषा बोलणारे आदिवासी जरी उत्तर व ईशान्य भागात आढळून येत असले तरी आर्य भाषांचा पगडा त्यांच्यावर अधिक पडलेला असल्यामुळे तिबेटी ब्राह्मणी भाषा आज लुप्त होत असल्याचे दिसते.

द्रविडी भाषा कुटुंब-

इंडो आर्यन भाषा'नंतर द्रविडी भाषा कुटुंबाचा संपन्नतेच्या दृष्टीने वरचा क्रमांक लागतो. इ.स.पु.3500 मध्ये द्रविडी लोक भारतात आले व त्यांच्याबरोबर ही भाषा भारतात आली. मेडिटेरेनियन व डिनारिक वंशाचे लोक ही भाषा बोलतात. या भाषेचे दोन भाग पडतात. एक, संपन्न द्रविडी भाषा व दोन, असंपन्न द्रविडी भाषा. संपन्न द्रविडी भाषेत तामीळ, मल्याळम, कन्नड व तेलगू या चार भाषांचा समावेश होतो तर असंपन्न द्रविडी भाषांमध्ये तुलू, कुर्गी, गोंडी, कुई, उरॉव, माल्टो, ब्रुही या भाषा समाविष्ट होतात.

भारतातील दक्षिण भारतात राहणाऱ्या आदिवासींमध्ये असंपन्न द्रविडी भाषांचे अस्तित्व दिसून येते. आंध्रमधील चेंचू, कोया, युनाडी, कोंडारेड्डी, कुल; त्रावणकोर कोचीनमधील कादर, केरळमधील मलंकुवरन, मलयन, मन्नन, विशवन, पुलयन; तामिळनाडूमधील तोडा, कादर, कुरूंबा, उरळी, कोरग; मैसूरमधील कूर्ग, गोंड, चेंचू, कोया, इत्यादी आदिवासी जमाती द्रविडी भाषा कुटुंबातील भाषा बोलतात. एकंदरीत द्रविडी भाषा कुटुंबातील भाषा केवळ दक्षिण भारतातच बोलल्या जात असून मध्य व उत्तर भारतात ही भाषा तुरळकपणे आढळून येते. गोंडी ही आदिवासींची प्रमुख भाषा आहे. पण द्रविडी भाषा कुटुंबातील असंपन्न भाषेवर संपन्न भाषांचा प्रभाव पडत आहे. कारण आज काही गोंड लोकांनी तेलगू भाषेचा स्वीकार केला आहे. त्याचबरोबर हिंदी, मराठी या भाषांचाही पगडा त्यांच्यावर पडत आहे.

1. इंडो-युरोपियन भाषा कुटुंब-

जगातील अधिकाधिक भाषांचा समावेश इंडो-युरोपियन भाषा कुटुंबात होत असून जगातील अधिक लोक ही भाषा बोलतात. या भाषा कुटुंबातील



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. H.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भाषा शाखा म्हणजे केटिक, जर्मेनिक, इटालिक, इंडो-पोर्तुगीज, ग्रीक, हिटिटि, टोखेरियन, अल्बेनियम, व आर्यन भाषा शाखा होत. भारतातील लोक आर्यन भाषा कुटुंबात सामाजिक होणाऱ्या भाषा बोलतात. यामध्ये संस्कृत, हिंदी, बंगाली, पंजाबी, गुजराती, मराठी, ओरिया या भाषांचा समावेश होतो. या सर्व भाषांचा वापर विशेषत्वाने बिगर आदिवासी लोक करतात. या भाषांचा प्रभाव हळूहळू सर्व भाषांवर पडत आहे. आदिवासी जमातींमध्ये या भाषा बोलल्या जाण्याचे हेच कारण आहे. ज्या आदिवासी जमाती प्रगत समाजाच्या संपर्कात आहेत त्या आदिवासींच्या भाषा आर्यन भाषेच्या प्रभावाखाली येत आहे. भारतातील आदिवासी आर्यपूर्व काळातील असल्याने किंवा बहुसंख्य आदिवासी आर्यत्तर असल्याने ते आर्यभाषा गटातील भाषा सर्रासपणे बोलत नाहीत. मात्र जे आदिवासी आर्यांच्या संपर्कात आले त्या जमातींमध्ये आर्यभाषांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. सारांशाने असे म्हणता येईल की, भारतातील आदिवासी या गटातील भाषांचा वापर करीत नाहीत.[14]

**वांशिक आधारावर वर्गीकरण**

संपूर्ण मानव जात ही शास्त्रीयदृष्ट्या जरी बुद्धिमत्तेची देणगी लाभलेल्या मानव या एकाच वर्गात मोडणारी असली तरी आणि सर्व मानवांची मूलभूत शरीररचना समान असली तरी संपूर्ण जगातील माणसांमध्ये अनेक कारणांनी शारीरिक भेद दिसून येतात. विशिष्ट शारीरिक लक्षणे असणाऱ्या मानव समूहाला एक विशिष्ट वंश म्हणून जगातील मानवांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा प्रयत्न शारीरिक मानवशास्त्रज्ञ करतात. उंची, त्वचेचा रंग, डोळ्यांचा आकार व रंग, कपाळ, नाक, ओठ, केस, जबडा हनुवटी इत्यादी लक्षणांच्या आधारे वंश ठरविले जातात. अर्थात पर्यावरणातील बदल वांशिक मिश्रण यासारख्या कारणांमुळे आणि प्राचीन अवशेषांच्या अभ्यासातील अडचणीमुळे मानवांचे वांशिक वर्गीकरण करणे अत्यंत अवघड देखील आहे. भारतातील लोकांचे असे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केला असून त्यांच्या विचारात एकमत नाही. या संदर्भातील प्रमुख मते पुढीलप्रमाणे आहेत.

अ) सर हर्बर्ट रिसले- या ब्रिटिश मानसशास्त्रज्ञाने भारतातील सर्व लोकांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा पहिला प्रयत्न केला. त्यांनी भारतीय लोकांची विभागणी सात वांशिक गटात केली. ते सात गट म्हणजे, 1. तुर्को-इराणी, 2. इंडो - आर्यन, 3. सीदो - द्रविडियन, 4. आर्य - द्रविड, 5. मंगोल - द्रविड, 6. मंगोल आणि 7. द्रविड. या विभागणीवर पुढे बरीच टीका झाली. विशेषता द्रविड लोक हेच भारतातील आद्य रहिवासी असल्याचे रिसले यांचे मत पुढील संशोधकांनी अमान्य केले. शिवाय या वर्गीकरणात भाषिक, सांस्कृतिक आणि शारीरिक निकषांचा एकाच वेळी विचार केलेला दिसतो.

ब) ए.सी.हेडन-

द्रविड लोक भारतात स्थायिक होण्यापूर्वी भारतात मनुष्यवस्ती होती हे सिद्ध करून हेडन यांनी भारतीय लोकांचे पुढील पाच वांशिक गट पाडले. 1) द्रविड पूर्व लोक, 2) द्रविड, 3) इंडो-आर्यन, 4) इंडो-अल्पाइन आणि 5) मंगोल.

क) जे.एच.हटन-

1931 च्या जनगणनेत महत्वाची कामगिरी बजावलेल्या या अधिकाऱ्याने भारतीय लोकांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा एक नवा प्रयत्न केला. आर्य आणि द्रविड हे वांशिक गट नसून भाषिक गट आहेत हे त्यांनी स्पष्ट करून भारतात एकूण सहा प्रमुख वांशिक गटाचे लोक असल्याचे सांगितले. हे सहा गट म्हणजे, 1) निग्रिटो, 2) प्रोटो-ऑस्ट्रलॉइड, 3) भूमध्यसागरीय, 4) अर्मेनोईड, 5) मंगोल आणि 6) इंडो-आर्यन.

ड) बी.एस.गुहा-

1931 जनगणनेच्या कामात श्री.बी.एस गुहा या भारतीय मानवशास्त्रज्ञाचाही महत्त्वाचा वाटा होता. श्री.गुहा यांनी विस्तृत संशोधनाच्या आधारे भारतीय लोकांची विभागणी सहा प्रमुख वंश आणि उपप्रकारासह नऊ विभागात केली आहे.

निग्रिटो-

पूर्व आफ्रिकेतील निग्रो लोकांच्या प्रमाणे काळा रंग, चपटे नाक, मोठे ओठ, लांब डोके, यासारख्या वैशिष्ट्यांनी युक्त असलेले दक्षिण भारतातील काही आदिवासी याप्रकारात मोडतात. कोटा, कुरंब, तोडा, कादर, इरुला, पनियन इ. जमातींची शारीरिक लक्षणे वरीलप्रमाणे दिसतात. हा मानव वंश भारतातील सर्वात जुना मानला जातो.

प्रटो ऑस्ट्रलॉइड- या वांशिक गटातील लोकांचा रंग काळा, उंची मध्यम, डोके लांब, नाक लहान व बसके,



Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.B.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

ही लक्षणे प्रमुख आहेत. मध्य भारतातील बहुतेक आदिवासी या गटात मोडतात. मुंडा, उराव, हो, गोंड, खोंड इ. जमाती या वांशिक लक्षणांची उदा. आहेत.

मंगोलॉइड-

पिवळा रंग, लांब डोके, मध्यम उंची, दाट व सरळ केस, खोल डोळे, रुंद मस्तक ही या वंशाच्या लोकांची प्रमुख लक्षणे आहेत. हिमालय प्रदेशातील व ईशान्य भारतातील बहुतेक आदिवासी या गटात मोडतात. सर्व नागा जमाती तसेच खासी कुकी लेपचा भोटिया इत्यादी जमाती ही या वंशाची उत्तम उदाहरणे असून चेहरे व डोळे यावरून मंगोलॉइड वंशाची छाप लगेच ओळखता येते.

भूमध्यसागरी किंवा मेटिटरेनियन- या गटाचे पेलिओ-मेटिटरेनियन, मेडिटरेनियन व पौर्वात्य असे उपविभाग गुहा यांनी पाडले आहे. या वांशिक प्रकारांची लक्षणे आदिवासींमध्ये फारसे आढळत नाही.

पश्चिमेकडील रुंद मस्तकाचे लोक-

यामध्येही अल्पिनाईड, डिनेरिक आणि आर्मेनाईड हे तीन उपप्रकार असून पश्चिम भारतातील बहुसंख्य लोक यापैकी कोणत्या तरी एका व प्रकारात मोडतात. हा वांशिक प्रकार की आदिवासींना फारसा लागू नाही.

नॉर्डिक- सामान्यतः आर्य वंशीय असे ज्यांना म्हटले जाते त्या लोकांचा या प्रकारात समावेश होतो. या लोकांमध्ये गोरा रंग, उंच बांधा, सरळ नाक इ. लक्षणे आढळतात. या प्रकारातही आदिवासी जमातींचा अंतर्भाव होत नाही. गुहा यांच्या वांशिक वर्गीकरणाबद्दल सर्वसाधारण एक मत आढळते. मात्र या वर्गीकरणात निग्रिटो वंशाचा समावेश मुजुमदार यांना मान्य नाही. त्यांच्या मते भारतात निग्रिटो वंशाचे आदिवासी आहेत याला निश्चित पुरावा देता येत नाही. त्यांच्या मते भारताच्या किनाऱ्यावर निग्रिटो वंशाची लक्षणे असलेले जे थोडे लोक आढळतात ते इ.स. 9 व्या शतकाच्या आसपास बाहेरून भारतात आले असावेत. गुहा यांच्या वर्गीकरण यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की भारतातील आदिवासी हे प्रामुख्याने निग्रिटो, प्रोटो-ऑस्ट्रलॉइड आणि मंगोलाइड या तीन वंशातीलच आहेत. तसेच कोणत्याही एका वंशाची सर्व विशिष्ट लक्षणे असणारी आदिवासी जमात दाखविणेही कठीण आहे. अनेक वंशाचे कमीअधिक मिश्रण प्रत्येक आदिवासी जमातीत दिसून येते. स्थूलमानाने इतकेच म्हणता येईल की अगदी दक्षिणेकडे असलेल्या आदिवासी जमातीत निग्रिटो वंशाची मध्य भारतात प्रोटो-ऑस्ट्रलॉइड वंशाची आणि ईशान्येकडे मंगोलाइड वंशाची बरीच लक्षणे दिसून येतात.[15]

**सांस्कृतिक स्तराच्या आधारावर वर्गीकरण**

भारतातील आदिवासी हे सांस्कृतिकदृष्ट्या वेगवेगळया स्तरावर असल्याचे दिसते. आदिवासींची संस्कृती पातळी लक्षात घेऊन डॉ. एल्विन यांनी भारतातील आदिवासींचे पुढील चार गटात वर्गीकरण केले आहे.

1. खऱ्या अर्थाने गिरिजन किंवा अतिशय मागासलेली आदिवासी.
2. स्थित्यंतर होत असलेले पण गिरीकंदरात राहणारे परंपराप्रिय आदिवासी.
3. बाह्य संपर्काने स्वतःची संस्कृती विसरत चाललेली आदिवासी.
4. बाह्य संपर्कात येऊनही स्वतःची संस्कृती टिकून धरलेले खानदानी आदिवासी.

इ.स.1952 मध्ये आदिवासी कल्याण समितीने आदिवासींचे सांस्कृतिक आधारावर केलेले वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

1. गिरी कांदास राहणारे व परंपरागत जीवन जगणारे आदिवासी.
2. खेड्यामध्ये राहणारे व शेती आणि इतर व्यवसाय करणारे अर्ध-आदिवासी.
3. आधुनिक जीवन जगणारे व पूर्ण संस्कृतीकरण झालेली आदिवासी.[16]

**आर्थिक क्रियांच्या आधारावर वर्गीकरण**

भारतातील आदिवासी एकसमान अशी आर्थिक क्रिया करत असल्याचे दिसत नाही. त्यांच्या आर्थिक क्रियांच्या स्वरूपात सर्वत्र विविधता आढळते. म्हणून आदिवासींच्या आर्थिक क्रियांचा विचार करून अनेक मानवशास्त्रज्ञ आदिवासींचे वर्गीकरण करतात. त्यानुसार आदिवासींचे पुढील प्रकार दिसतात.

1. शिकारीवर उपजिवीका करणारे आदिवासी.
2. कंदमुळे व फळे गोळा करून व काही प्रमाणात शेती करून जगणारे आदिवासी.
3. प्रामुख्याने शेती करणारे आदिवासी.
4. मजुरीवर पोट भरणारे आदिवासी.[17]

याप्रकारे भारतातील आदिवासींचा आर्थिकदृष्टीने विचार केला असता आदिवासींचे आर्थिक प्रश्न किती गंभीर आहेत हे दिसून येते



Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.S.S's Smt. ...U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**समारोप**

घटनात्मक तरतुदीनुसार आदिवासींच्या विकासासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा फायदा भारतातील सर्व ठिकाणच्या आदिवासींना सारख्या प्रमाणात झाला असल्याचे दिसत नाही. त्यामुळे शिक्षण आणि आर्थिक सुधारणा यांचा 'फायदा मिळालेले आदिवासी' व आजही 'उपेक्षित राहिलेले आदिवासी' असा फरक दिसून येतो. म्हणून भारतातील वेगवेगळ्या प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींचे काही ठराविक निकषांच्या आधारे वर्गीकरण करून त्यांच्या स्थितीचा अभ्यास केला तरच त्यांचे प्रश्न सोडवता येऊ शकतात.

**संदर्भ सूची**


1. माधव कशाळीकर आणि जयवंत कांबळे, 'आदिवासी भारत', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, 1988, पृ.15,16
2. कित्ता, पृ.16
3. कित्ता, पृ.16,17
4. कित्ता, पृ.17,18
5. कित्ता, पृ.18
6. गुरुनाथ नाडगोंडे, 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 2003, पृ.336-341
7. उपरोक्त, माधव कशाळीकर व जयवंत कांबळे, 'आदिवासी भारत',1988, पृ.19-21
8. उपरोक्त, गुरुनाथ नाडगोंडे, 'भारतीय आदिवासी', 2003, पृ.347,348
9. उपरोक्त, माधव कशाळीकर व जयवंत कांबळे, 'आदिवासी भारत', 1988,पृ.16


Sakri (Dhule)

PRINCIPAL
Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule